महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : १०२४/२०२२**

**अपिलार्थी, श्री. हिराचंद अभयकुमार मिश्रीकोटकर**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा अप्पर कोषागार अधिकारी,**
कोषागार कार्यालय नागपूर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ कोषागार अधिकारी,**
कोषागार कार्यालय नागपूर

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०६.२०२४**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १२.११.२०२१ | ०७.१२.२०२१ | २४.१२.२०२१ | १४.०१.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १२.११.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक सेनिवे-२०१९/प्र.क्र.१४४/सेवा-४, दि. ०२ मार्च २०२० नुसार सार्वजनिक क्षेत्रात समावून घेतल्यानंतर एकरकमी ठोक रक्कम स्विकारलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांचे उर्वरित २/३ निवृत्ती वेतन पुन:स्थापित करणे व त्यांचे निवृत्तीवेतन सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित करणे. त्यानुसार दिनांक २२.०१.२०२१ रोजीचा मुळ अर्ज, स्मरणपत्र दि. २२.०३.२०२१, १७.०६.२०२१, २९.०९.२०२१, ०४.१०.२०२१, २२.१०.२०२१ व १२.११.२०२१ उपरोक्त मुळ पत्र व त्यावरील स्मरणपत्रांवर केलेली कारवाई यासंदर्भात" माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, आपणांस दिनांक २४.११.२०२१ तसेच २६.११.२०२१ रोजी कोषागारात (निवृत्तीवेतन शाखा) प्रत्यक्ष चर्चा करण्यासाठी बोलविण्यात आले होते. आपले प्रत्यक्ष भेटी दरम्यान आपणास पाहिजे असलेल्या माहितीचा प्रकरणी विस्तृत चर्चा करण्यात आली असून त्यामध्ये तांत्रिक अडचणी निदर्शनास आल्यामुळे त्याबाबत वरिष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शन मागविणेबाबत तसेच सेवानिवृत्ती पूर्वीची माहिती आपले कार्यालयाकडून मागविण्याची कार्यवाही सुरु असल्याबाबत अपिलार्थीस कळविले आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक २४.१२.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती मिळाली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११.०१.२०२२ रोजी सुनावणी घेवून दिनांक १४.०१.२०२२ अन्वये, दि. ११.०१.२०२२ रोजी सुनावणी दरम्यान मा. महालेखापाल, लेखा व हकदारी, नागपूर यांचेकडून प्राप्त प्राधिकार पत्रान्वये श्री. हिराचंद अभयकुमार मिश्रीकोटकर यांना निवृत्तीवेतन प्रदान करण्यात येत असल्याचे आणि त्यामध्ये जर काही सुधारणा असल्याबाबतचे प्राधिकारपत्र या कार्यालयास प्राप्त झाल्यास सदरची कार्यवाही करण्याबाबत त्यांना पटवुन देण्यात आले. त्यानुसार श्री. हिराचंद अभयकुमार मिश्रीकोटकर यांचे समाधान झाल्याने सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे, असे आदेश पारीत केले आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ११.०४.२०२२ रोजी** " माहिती मिळाली नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक १२.०४.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक २४.०६.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अपर कोषागार अधिकारी, श्री. प्रशांत बोरकर व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्र. वरिष्ठ कोषागार अधिकारी, श्रीमती मोनाली भोयर हे ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत.

आज झालेल्या सुनावणीत अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. मात्र जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस हजर असून प्राधिकरणाच्या वतीने सविस्तर खुलासा सादर केला आहे. यातील दिनांक ०२ मार्च, २०२० रोजी जारी करण्यात आलेला शासन निर्णय व यासंदर्भात शासनाच्या वतीने निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शन सुचना याचा समावेश असून अपिलार्थी यांना प्रदान करण्यात आलेल्या माहितीबाबत खालीलप्रमाणे स्वंयस्पष्ट खुलासा केलेला आहे.

१. कोषागार कार्यालय निवृत्तीवेतनधारकांच्या बाबतीत केवळ संवितरण अधिकारी म्हणून कार्य करते. निवृत्तीवेतनासंबंधी सर्व बाबीची निश्चिती करणे हे त्यांचे संबंधित कार्यालय प्रमुख निवृत्तीवेतन मंजुर प्राधिकारी म्हणून कार्य करीत असते. ते निवृत्तीवेतन प्रकरण प्राधिकृत करण्यासाठी महालेखाकार कार्यालयास सादर करतात. महालेखाकार कार्यालय प्रकरण तपासून तो प्राधिकारपत्र कोषागार कार्यालयास पाठवतात. त्यात नमूद प्राधिकृत रक्कमा प्रदान करणे तसेच त्यात नमूद निर्देशांचे पालन करण्याचे काम कोषागार कार्यालयाचे आहे.

२. सदर प्रकरणी महालेखाकार कार्यालयाचे प्राधिकार पत्र दि. २२.०५.२०१२ या कार्यालयास दि. २८.०५.२०१२ रोजी प्राप्त झाले. त्याअनुषंगाने निवृत्तीवेतन धारकाची ओळख तपासणी दि. ०९.०७.२०१२ रोजी करुन महालेखाकार कार्यालयाने प्राधीकृत केल्यानुसार त्यांना निवृत्तीवेतन सुरु करण्यात आले. सदर प्रकरणी मा. महालेखाकार कार्यालयाकडून प्राप्त अभिलेख्यानुसार (महालेखाकार कार्यालयाचे प्राधिकार पत्र दि. ०४.१०.१९९९) त्यांना १/३ अंशराशीकरण तसेच २/३ अंशराशीकृत निवृत्तीवेतनाची एकमुस्त रक्कम देण्यात आल्याचे दिसून येते. संदर्भीय पत्र दिनांक १५.०१.२०१४ नुसार त्यांना दिनांक १८.०४.२०११ पासून रु. २०३२/- प्रमाणे निवृत्तीवेतन अधिक मुळ निवृत्तीवेतन रु. २८८२/- वरील महागाई भत्ता याप्रमाणे निवृत्तीवेतन अदा करण्याचे महालेखाकार कार्यालयाकडून



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

आदेशीत करण्यात आलेले होते. महाराष्ट्र नागरी सेवा (अंशराशीकरण) नियम १९८२ नुसार ही कपात १५ वर्षासाठी करावयाचे असून त्यानंतर तो भाग पुर्नस्थापीत होतो. त्यानुसार अंशराशीकृत भाग सदर प्रकरणात दि. १७.०४.२०२६ रोजी पुर्नस्थापीत करण्यात येईल. (संदर्भीय प्राधिकारपत्र दि. २२.०५.२०१२ व १५.०१.२०१४ तसेच संदर्भीय शासन निर्णयाच्या प्रती सोबत संलग्न परिशिष्ठ १ व २ व संबंधित शासन निर्णय परिशिष्ठ ३)

३. सदर प्रकरणी निवृत्तीवेतन धारकांचे १२.११.२०२१ रोजी माहिती अधिकार नियमान्वये माहिती मागितली होती. त्याचे उत्तर दि. ०७.१२.२०२१ रोजी देण्यात आले होते. त्यांनी पुढे दि. २४.१२.२०२१ रोजी अपिलीय अर्ज केलेला होता. त्याची सुनावणी दि. ११.०१.२०२२ रोजी घेण्यात आली. त्यावेळी त्यांनी त्यांचे समाधान झाल्याबाबत सहमती दर्शविल्याने अपील निकाली काढण्यात आले. (जोडपत्र परिशिष्ठ ४)

४. त्यांना शासन निर्णय, वित्त विभाग, दि. २४.०१.२०१९ नुसार दि. ०१.०१.२०१६ पासून ७ वा वेतन आयोग लागू करुन त्यानुसार निवृत्तीवेतन अदा करण्यात येत आहे. (परिशिष्ठ ५)

५. सदर निवृत्तीवेतनाच्या उर्वरित २/३ रक्कमेचे पुर्नस्थापन कशाप्रकारे करण्यात यावे, याबाबत आवश्यक ते अभिलेख या कार्यालयात उपलब्ध नसल्याने पुर्नस्थापनेबाबत पुढील कार्यवाही करण्यासाठी मा. महालेखाकार यांचे मार्गदर्शन तसेच त्यांचेकडे उपलब्ध असलेले दस्ताऐवज मागविण्यात आलेले आहे. सदर प्रकरणी मा. महालेखाकार यांचे आदेश प्राप्त होताच योग्य ती कार्यवाही करण्यात येईल."

यातील मुद्देनिहाय खुलाश्यात शासन निर्णय व शासनाव्दारे मार्गदर्शनाचा समावेश असून वरील खुलासा स्वंयस्पष्ट आहे. माहिती अधिकारात कलम २(च) नुसार कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती प्रदान करणे अपेक्षित असून कलम ५(३) नुसार जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावरुन अपिलार्थी यांना प्रशासकीय बाबींवर मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे. प्रस्तूत प्रकरणी अपिलार्थी यांच्या सेवानिवृत्ती वेतनातील क्लिष्टता याबाबत निर्गमित केलेले शासन निर्णय इत्यादीचे अवलोकन केले असता, कोषागार कार्यालयामार्फत देण्यात आलेला प्रतिसाद हा माहितीचा अधिकार कायद्याशी सुसंगत असल्याचे आढळून येते. ही बाब लक्षात घेता, प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर * नागपूर *

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २४.०६.२०२४**

जावक क्रमांक 7087 दिनांक 3 OCT 2024